# अंतिम हुकूमनामा क्र.०१/२०२४ मधील
# निशाण क्र.४३ खालील आदेश

[ CNR No.MHKO090005962023 ]

प्रस्तुतचा अर्ज वि.प. क्र.१ ते ४ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना–म्हणणेचा आदेश रद्द करणेत येवून त्यांचे म्हणणे सादर करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केला आहे. वि.प.क्र.१ ते ४ थोडक्यात असे कथन आहे की, त्यांना योग्य ती कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना–म्हणणेचा आदेश पारीत करणेत आला. प्रस्तुतच्या अर्जास अर्जदारमार्फत आक्षेप नोंदविण्यात आला की, वि.प. यांचा अर्ज हा खोटा व लबाडीचा आहे. अर्जामध्ये कोणतेही सबळ कारण नमूद नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

२. प्रस्तुतचे प्रकरण हे फायनल डिक्रीसंदर्भात असल्याने यामध्ये प्रत्येक पक्षास त्यांची बाजु मांडणेची योग्य ती संधी मिळणे क्रमप्राप्त राहते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने योग्य तो दंड आकारुन अर्ज मंजूर केल्यास न्यायोचित ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम अर्जदार यांना अदा करावी.

२) वि.प.क्र.१ ते ४ यांचेविरुध्द झालेला विना–म्हणणेचा आदेश रद्द करणेत येत असून त्यांना म्हणणे दाखल करणेस परवानगी देणेत येत आहे.

Digitally signed by NARENDRA
Date: 2024.12.13 11:32:37 +0530

स्थळ : गडहिंग्लज.		( न. श्री. पुरी )

दिनांक : १२.१२.२०२४.		दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गडहिंग्लज